दि. 07/04/2023

सकाळ पृ. पान क्र. 1

# नोकरीसाठी थायलंडऐवजी म्यानमारमध्ये रवानगी

## भरोसा सेलकडून भाईंदरमधील पीडित तरुणाची सुटका

भाईंदर, ता. ६ (बातमीदार) : थायलंड येथे नोकरी देण्याच्या बहाण्याने बेकायदेशीररीत्या म्यानमारमध्ये पाठवलेल्या भाईंदर येथील तरुणाची मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिसांच्या भरोसा सेलने यशस्वी सुटका केली आहे. हा तरुण नुकताच भारतात परतला आहे.

उत्तन येथील शहजान खान (वय २५) याला ठाणे येथील एका एजंटने थायलंड येथे नोकरी देण्याचे प्रलोभन दाखवले. त्यानंतर गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात शहजानला चेन्नई विमानतळावरून थायलंडला पाठवले; मात्र त्या ठिकाणी त्याला नोकरी न देता बेकायदा मान्यमारला पाठविण्यात आले. तेथे त्याला एका कंपनीत कॉलिंगचे काम देण्यात आले. या कामाचे देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास त्याचा अमानुष छळ केला जात होता. तसेच त्याच्याकडील मोबाईलही काढून घेण्यात आला होता. जवळपास महिन्याभराने शहजानला अर्ध्या तासासाठी मोबाईल देण्यात आला. ही संधी साधून त्याने आई परवीन शेखशी संपर्क साधला आणि आपल्याला बेकायदा म्यानमारमध्ये आणण्यात आल्याचे सांगितले; मात्र त्यानंतर त्याचा कुठलाही संपर्क झाला नाही आणि म्यानमारमध्ये नेमका कुठे आहे, याची माहितीही मिळाली नाही.

### कशी झाली सुटका?

फसवणुकीद्वारे परदेशात अडकलेल्यांची भाईंदर येथील भरोसा सेलने सुटका केल्याची माहिती आई परवीन शेख यांना होती. त्यानुसार त्यांनी भरोसा सेलमध्ये तक्रार दाखल केली. भरोसा सेलच्या सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे यांनी याप्रकरणी गुन्हे शाखेचे उपायुक्त अविनाश अंबुरे व सहायक निरीक्षक अमोल मांडवे यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार म्यानमारमधील भारतीय दूतावासाशी संपर्क साधला. दूतावासाने तपास करत शहजानची म्यानमारमधून सुटका करून त्याला ३० मार्चला भारतात सुखरूप आणण्यात आले.

पुढारी पृ. पान क्र. 4

# टेम्पोचा लॉक तोडून मुद्देमाल पळवणाऱ्यास अटक

## २१ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील पेनकर पाडा येथे उभ्या करून ठेवलेल्या टेम्पोचा लॉक तोडून चोरी करणाऱ्या आरोपीस काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून २१ लाख ५९ हजार ३४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिरारोड परिसरात राहणारे अनिकेत नवनाथ पवार (२५) यांनी त्यांच्या टाटा एस टेम्पोमध्ये भिवंडी येथील गोडावून मधुन महागडे मोबाईल तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्य असा २१,९१,७०२ रुपयांचा माल भरून भाईंदर पश्चिम येथील एका दुकानात डिलेवरी करण्यासाठी पेणकरपाडा, काशिमीरा येथे आणून टेम्पो उभा करून ठेवला होता. रात्री



हा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने टेम्पोचा लॉक तोडुन त्यातील महागडे मोबाईल तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्य असा एकुण २१ लाख ९१ हजार ७०२ रुपयांचा मुद्देमाल पळवला. या प्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात १ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणण्याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्याचे व.पो.नि. संदीप कदम यांनी आदेश व मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे व पथकाने त्या घटनास्थळावर मिळून आलेले जवळपास ५०० पेक्षा जास्त सी. सी. टी. व्ही. फुटेज व इतर माहितीच्या आधारे आरोपी विशाल रमेश राजभर यास सिवील हॉस्पीटल परिसर, बलसाड, गुजरात येथे सापळा रचून ताब्यात घेतले. या आरोपीने हा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी आकाश सुशील मंडल (रा. पेणकरपाडा, मिरारोड) याच्यासह केला असल्याचे तपासात उघडकीस आहे. अटक केलेल्या आरोपीच्या ताब्यातून गुन्हयात चोरी केलेल्या मुद्देमालापैकी २१ लाख ५९ हजार ३४४ रुपयांचा मोबाईल तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्य असा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक आरोपी हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरोधात मुंबई, ठाणे, बलसाड, गुजरात येथे घर फोडीचे व बतावणीचे १० पेक्षा जास्त गुन्हे नोंद आहेत.

ही कारवाई वपोनि संदीप कदम, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि प्रशांत गांगुर्डे, पोउपनि प्रकाश काबरे, सपोउपनि अनिल पवार, अंमलदार सचिन हुले, निलेश शिंदे, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, पोलीस अंमलदार रविंद्र कांबळे, प्रविण टोवरे यांनी केली.

CamScanner

दि. 07/04/2023

पुढारी पान क्र.7

# भाईंदरमध्ये ऑर्केस्ट्रा बारवर पोलिसांची कारवाई

## ७ इसमांना अटक, अश्लील नृत्य करत असल्याचे आले निदर्शनास



संग्रहीत छायाचित्र

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेच्या रुपेश ऑर्केस्ट्रा बारवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईदर यांनी कारवाई केली असून ऑर्केस्ट्रा बारचा मॅनेजर कम कॅशिअर, ३ वेटर , १ स्टीवर्ड, पुरुष सिंगर व वादक १ अशा ७ इसमांना अटक करण्यात आली आहे.

भाईंदर पूर्वेच्या रेल्वे स्टेशन समोर असलेल्या रुपेश ऑर्केस्ट्रा बारमध्ये महिला सिंगरच्या नावाखाली परवाना नसतांना त्या बारचे चालक, मालक, मॅनेजर, कॅशिअर, स्टीवर्ड, वेटर, वादक, सिंगर मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहीत करून त्याचंकडुन अश्लिल नृत्य करून घेत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे पो.नि. समीर अहिरराव यांनी पोलीस पथकासह रुपेश ऑर्केस्ट्रा बार या ठिकाणी बुधवारी मध्यरात्री छापा टाकला. त्यावेळी रुपेश ऑर्केस्ट्रा बारमध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावर महिला सिंगर अश्लिल नृत्य करत असल्याचे निदर्शनास आले. तसेच ऑर्किस्ट्रा बारचे चालक, मॅनेजर कम कॅशियर, वेटर, स्टीवर्ड, पुरुष सिंगर व वादक हे बारमधील महिला सिंगर यांना अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करत असताना निदर्शनात आले. रोख रक्कम ३१,००० रुपये व २१ पारदर्शक प्लास्टीक रोल त्यामध्ये १० रु दराच्या खेळण्यातील हुबेहूब दिसणारे नोटाचे रोल, चित्रीकरण केलेली क्लीप जप्त करुन त्या ऑर्किस्ट्रा बारचा मॅनेजर कम कॅशिअर १, वेटर ३, स्टीवर्ड १, पुरुष सिंगर व वादक १ अशा एकुण ७ इसमांना ताब्यात घेण्यात आले. तसेच पाहिजे आरोपी रुपेश बारचा चालक व मालक, तपासात निष्पन्न होणारे इतर चालकांविरुध्द नवघर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम- २०१६ चे कलम ३, ८ (१) (२) प्रमाणे नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढारी पु. पान क्र.1

# घरचे रागावल्याने आठवीत शिकणाऱ्या मुलाची आत्महत्या

**मीरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत आठवीत शिकणाऱ्या मुलाला त्याने केस कापल्यानंतर केसाचा असा कट का मारला म्हणून त्याच्यावर घरचे रागावल्याने त्याने १६ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. अशी दुर्दवी घटना घडल्याने नागरिकांनी दुःख व्यक्त केले आहे. या घटनेबाबत नवघर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



भाईंदर पूर्वेच्या एका इमारतीमध्ये १६ मजल्यावर एक कुटुंब राहते. त्यांचा १३ वर्षाचा मुलगा हा आठवीत शिकत होता. तो मंगळवारी रात्री केस कापण्यासाठी सलूनमध्ये गेला होता. लहान मुले केसाचा हेअर कट वेगवेगळे मारत असल्याने त्याने देखील त्याच्या केसाचा कट वेगळा केला होता. केस कापून घरी आल्यानंतर केसाचा कट असा का केला, असे म्हणत त्याचे कुटुंबीय त्याच्यावर रागावले. घरचे रागावल्यामुळे त्याला राग सहन झाला नाही. त्यानंतर तो बाथरूममध्ये गेला घरच्यांना वाटले तो अंघोळ करत असेल म्हणून त्यांनी लक्ष दिले नाही. परंतु बराच वेळ तो बाहेर आला नाही. त्यावेळी त्यांनी पाहिले असता त्याने रात्री साडेअकराच्या सुमारास बाथरूममधील छोट्याशा खिडकीतून उडी मारून आत्महत्या केली. ही घटना घडल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेचा पुढील तपास नवघर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पालवे हे करत आहेत.

CamScanner

लोकसत्ता पु.पान क्र.१ दि.07/04/2023

# तोतया डॉक्टरांचा सुळसुळाट सुरूच

## किरकोळ कारवाईचा फटका

**सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता**

**वसई :** तोतया डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी प्रस्तावित तोतया डॉक्टर प्रतिबंधक कायदाला अद्याप मंजुरी मिळाली नसल्याने तोतया डॉक्टरांवरील कारवाई प्रभावी ठरत नाही. सध्या अशा डॉक्टरांवर केलेल्या कारवाई किरकोळ असल्याने ते सहज सुटतात आणि दुसऱ्या ठिकाणी धंदा सुरू करतात. त्यामुळे तोतया डॉक्टर प्रतिबंधक कायदा लागू करावा, अशी मागणी डॉक्टर संघटना तसेच महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडून करण्यात आली आहे.

तोतया डॉक्टर दोन प्रकारांत मोडतात. एक म्हणजे ज्याच्याकडे काहीच पदवी नाही आणि दुसरे म्हणजे ज्याच्याकडे पदवी असून मान्यताप्राप्त वैद्यकीय परिषदेमध्ये नोंदणी नाही. राज्यात वैद्यकीय सेवा देण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषद आणि महाराष्ट्र आयुर्वेद परिषद तीन परिषदांमध्ये नोंदणी करावी लागते. एखाद्या डॉक्टरने एमबीबीएसची किंवा होमियोपॅथी, आयुर्वेदमधील पदवी जरी घेतली असली तरी त्याला संबंधित वैद्यकीय परिषदेमध्ये नोंदणी करावी लागते. त्याशिवाय त्याला कुठेही दवाखान्यात, रुग्णालयात डॉक्टर म्हणून काम करता येत नाही. निकष डावलून अनेक तोतया डॉक्टरांनी दवाखाने उघडले आहेत. दुसरीकडे कायदा जरी नसला तरी समिती कार्यरत असणे अपेक्षित आहे. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थानिक पातळीवर असते. मात्र ही समिती अनेक ठिकाणी नाही आणि बऱ्याच ठिकाणी कागदावरच आहे. मुंबईसारख्या शहरात समितीची बैठकही झालेली नाही.



### कायदा तयार पण मंजुरी नाही

तोतया डॉक्टर प्रतिबंधक कायदा तयार करण्यात आला आहे. या कायद्यात गंभीर शिक्षेची तरतूद आहे. पण तो मंजूर नसल्यामुळे अशा डॉक्टरांवर कारवाई केंद्र शासनाकडून करता येत नाही. सध्या फौजदारी प्रक्रियेनुसार म्हणजे भादंविच्या कलम ४२० अन्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल होतो. ही कलमे किरकोळ आणि जामीनपात्र आहेत. त्यामुळे गुन्हा दाखल झाल्यानंतरही जामिनावर सुटून हे डॉक्टर दवाखाने चालवतात. हा कायदा लागू झाला तरच बोगस डॉक्टरांवर कडक कारवाई करून त्यांना आळा घालता येईल, असे महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. शिवकुमार उत्तुरे यांनी सांगितले.

## वर्षभरात एकाही डॉक्टरचा शोध नाही

### वसई-विरार पालिकेची समिती कागदावरच

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेची तोतया डॉक्टरविरोधातील मोहीम थंडावली आहे. पालिकेची तोतया डॉक्टरविरोधी समिती असली तरी स्वतःहून कारवाई केलेली नाही.

२०२१ च्या अखेरीस शहरात तोतया डॉक्टरांचे प्रकरण उघडकीस आले होते. पालिकेचा मुख्य वैद्यकीय अधिकारी सुनील वाडकर नावाचा तोतया तब्बल १३ वर्षे नगर परिषद आणि पालिकेत मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून वावरत होता. 'लोकसत्ता'ने हे प्रकरण उघडकीस आणल्यानंतर खळबळ उडाली होती. सुनील वाडकर, हेमंत पाटील नावाचे तोतया डॉक्टर गजाआड झाले. वाडकरविरोधात विविध पोलीस ठाण्यांत १० गुन्हे दाखल झाले. मात्र पालिकेने शहरातील तोतया डॉक्टरांची धरपकड केली नाही. पालिकेची तोतया डॉक्टर समिती कागदावरच असल्याचे आढळून आले. पालिका कारवाई करत नसल्याने तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी गुन्हे शाखेचे एक विशेष पथक स्थापन करून शहरातील २४ तोतया डॉक्टर शोधून काढले होते. दाते यांची बदली झाल्यानंतर पुन्हा बोगस डॉक्टर सक्रिय झाले आहेत.

> पालिकेची तोतया डॉक्टरविरोधी समिती तयार करण्यात आली आहे. अशा डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई केली जाते. करोनाकाळात मोहीम थंडावली होती. मात्र आता समिती कार्यरत करून कारवाई केली जाईल.
>
> **-डॉ. विजयकुमार द्वासे,** उपायुक्त (आरोग्य), वसई-विरार महापालिका

लोकमत पान क्र.३

## विरारमध्ये ब्राऊन शुगर जप्त

**नालासोपारा :** विरारमध्ये ब्राऊन शुगरचा साठा जप्त करण्यात विरार पोलिसांना यश आले आहे. जीवदानीपाडा येथे बुधवारी दुपारी एकच्या सुमारास राजेश गोविंद गाजूला (४३) व भूत ऊर्फ साबीर मेहमूद सय्यद (४१) यांच्याकडे २० हजार रुपये किमतीचा २० ग्रॅम वजनाचा ब्राऊन शुगर नावाचा अमली पदार्थ आढळून आला होता. हे अमली पदार्थ दोन्ही आरोपींनी बेकायदा विक्रीसाठी आणले असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून आरोपींविरोधात बुधवारी विरार पोलिस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टखाली गुन्हा दाखल केला आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**नालासोपारा :** विरारमध्ये १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. मनवेलपाडा परिसरात राहणारी अल्पवयीन मुलगी बुधवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास घरातून बेपत्ता झाली होती. तिला आरोपीने कशाचे तरी आमिष दाखवून सोबत पळवून नेल्याचा संशय आल्याने मुलीच्या आईने बुधवारी विरार पोलिस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल केली आहे.

लोकमत पु.पान क्र.१

## अल्पवयीन मुलगा जखमी

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेस पाचव्या मजल्यावरून पडून १७ वर्षांचा अल्पवयीन मुलगा जखमी झाला आहे. सुदैवाने तो बचावला असून त्याचे दोन्ही पाय व उजवा खांदा फ्रॅक्चर झाला आहे. ही घटना भाईंदर पूर्वेच्या नर्मदानगरमध्ये ओमकार रेसिडेन्सी इमारतीत घडली. बुधवारी पहाटे तीन वाजता मुलगा मयांक पाल (वय १७) हा पाचव्या मजल्यावरून पडून जखमी झाल्याची माहिती त्याच्या वडिलांना समजली. त्याला रुग्णालयात दाखल केले आहे. याप्रकरणी नवघर पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

CamScanner

लोकमत पू. पान क्र.1

दि. 07/04/2023

सामना पान क्र.6

# धार्मिक घोषणा देणाऱ्या नऊ जणांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरारोडच्या नया नगर भागातील एका मशिदीसमोर दुपारची नमाज संपल्यानंतर भगवे झेंडे फडकावून धार्मिक घोषणा दिल्याने गुरुवारी तणावाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, स्थानिक पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून सहा जणांना अटक केली. असाच प्रकार बुधवारी करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली. स्थानिक मुस्लिम बांधव संतप्त झाल्याने जमाव जमला होता. मात्र, पोलिसांनी त्यांची समजूत काढल्याने वाद चिघळला नाही.

नया नगर परिसर हा मुस्लिमबहुल असून सध्या पवित्र रमजान महिना सुरू आहे. दुपारी १ ते २ दरम्यान नमाज अदा केली जात असल्याने गुरुवार ६ एप्रिल रोजी पोलिस उपनिरीक्षक सचिन शेडगे व अंमलदार गोडवे हे गस्त घालत होते. सव्वादोनच्या सुमारास लोढा मार्ग येथील मोहम्मदी मस्जिद समोर गर्दी व गोंधळ दिसल्याने पोलिस तिकडे गेले. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या व हातात भगवे झेंडे असलेल्या दोघांना रहिवाशांनी पकडून ठेवले होते.

रहिवाशांनी सांगितले की, नमाजसाठी लोक आले असताना दुचाकीवरून हातात भगवे झेंडे घेऊन आलेल्या तरुणांनी मुस्लिम बांधवांकडे पाहून जोरजोरात हॉर्न वाजवत धार्मिक घोषणा दिल्या. त्यामुळे लोकांनी एका दुचाकीवरील दोघांना पकडले तर बाकीचे सर्व पळून गेले. शेडगे यांनी त्या दोघांना पकडून नया नगर पोलिस ठाण्यात आणले. अन्य दोघांना निवृत्ती कर्डेल व मनीषा चौधरी या पोलिस कर्मचाऱ्यांनी पकडून आणले.

अभी रवींद्र सिंग (१९), राम राजश्री (इंद्रलोक), शुभम मुन्ना विश्वकर्मा (१९), ज्ञानी युवराज रावल (१८) तसेच एक १७ वर्षीय अल्पवयीन मुलाचा पकडलेल्यात समावेश आहे. नंतर आणखी दोघांना अटक करण्यात आली.

### सीसीटीव्ही आधारे तपास

- ५ एप्रिल रोजी नया नगरमधील नीलम पार्क भागातल्या महंमदीया मदरशाजवळ येऊन तिघांनी असेच भगवे झेंडे घेऊन धार्मिक घोषणा दिल्या.
- निवृत्ती कर्डेल यांच्या फिर्यादीमुळे गुन्हा दाखल होऊन सीसीटीव्ही आधारे तपास करत होते.
- फुटेजच्या आधारे शोध घेऊन सहायक निरीक्षक पराग भाट, ओमप्रकाश पाटील, विकास यादव, विजय गुरव, महेश खामगळ यांच्या पथकाने तिघांना मीरारोडच्या क्वीन्स पार्कमधील पंचरत्न इमारतीमधून पकडले.

---

नवीन घर बघायला गेले आणि घात झाला

# भाईंदरमध्ये पाण्याच्या टाकीत पडून बालकाचा मृत्यू

**भाईंदर, दि. ६ (सा.वा.)** – वडिलांनी घेतलेले नवे घर बघण्यासाठी गेलेल्या आठ वर्षीय बालकाचा पाण्याच्या टाकीत पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मीरा रोडमध्ये घडली आहे. कौशल मिश्रा असे मृत मुलाचे नाव आहे. याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात विकासकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा रोड पूर्व येथील रामदेव पार्क परिसरात 'सावलिया अवेन्यू' या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या इमारतीच्या सातव्या मजल्यावर मिश्रा कुटुंबीयांनी घर विकत घेतले होते. १ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास उमेशकुमार मिश्रा हे वडील श्रीनारायण मिश्रा आणि दोन मुले पियुष, कौशल यांच्यासह नव्या घराची पाहणी करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांचा लहान मुलगा कौशल हा कुटुंबीयांना सोडून इमारतीच्या परिसरात खेळायला गेला. यादरम्यान झाकण नसलेल्या पाण्याच्या टाकीत तो कोसळला. बराच वेळ झाला तरी कौशल परत आला नाही म्हणून कुटुंबीयांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. यावेळी उमेशकुमार यांना कौशल हा बेशुद्ध अवस्थेत पाण्याच्या टाकीत पडलेला आढळला. त्यांनी कौशलला टाकीबाहेर काढून तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### विकासकांचा हलगर्जीपणा

विकासकांच्या हलगर्जीपणामुळे बालकाचा मृत्यू झाल्याचा आरोप मिश्रा कुटुंबीयाने केला आहे. रमेशकुमार यांच्या तक्रारीवरून विकासक रोशनलाल मालू आणि डंगुर मेहरा याच्या विरोधात मीरा रोड पोलीस ठाण्यात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा अधिक तपास मीरा रोड पोलीस करत आहेत.

---

पुण्यनगरी पू. पान क्र.1

# भावाचा खून करणाऱ्यास आजन्म कारावास

**मीरा रोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीत २०१८ मध्ये पैशाच्या कारणावरून भावाचा खून करणाऱ्या आरोपी भावास न्यायालयाने आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे. नवघर पोलीस ठाणे हद्दीत ४ ऑगस्ट २०१८ रोजी व्हिक्टर रफायल पात्राव यांनी नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. तक्रारीनुसार त्यांचा भाऊ सायमन रफायल पात्राव याने भाऊ विल्फ्रेड पात्राव याच्या बँक खात्यातून एटीएमद्वारे २० हजार रुपये काढले म्हणून विल्फ्रेड पात्राव याने सायमन पात्राव यास खात्यातून पैसे का काढले? असे विचारले असता, त्या दोघांमध्ये भांडण झाले. त्या वेळी विल्फ्रेड याने सायमन यास मारण्याची धमकी दिल्याने त्याचा राग मनात धरून भाऊ सायमन याने विल्फ्रेड याच्या छातीवर सुरीने वार करुन खून केला. या घटनेबाबत नवघर पोलीस ठाण्यात ४ ऑगस्ट २०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी सायमन रफायल पात्राव (२९) यास तपास अधिकारी यांनी गुन्हा दाखल होताच त्याच दिवशी अटक केले होते. या गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर नवघर पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम भालसिंग यांनी जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दोषारोप पत्र दाखल केले होते. या आरोपीस बुधवारी जिल्हा न्यायालय, ठाणे नं. ६ च्या रचना तेहरा यांनी दोषी ठरवून कलम ३०२ मध्ये आजन्म कारावास व ५००० रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिन्यांची साधी कैद तसेच कलम २०१ मध्ये ३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

CamScanner

म.टा.पू.पान क्र.1

दि. 07/04/2023


# १५ शाळा झाल्या अधिकृत

## वसई-विरारमधील ११० अनधिकृत शाळांपैकी ३० शाळांवर गुन्हे

**वैष्णवी राऊत,** वसई

■ शिक्षण विभागाने दिली माहिती

■ विद्यार्थ्यांची सुरक्षा टांगणीला




वसई तालुका शिक्षण विभागाकडून मागील वर्षी जाहीर करण्यात आलेल्या यादीतील ११० अनधिकृत शाळांपैकी वर्षभरात केवळ १५ शाळा अधिकृत करण्यात आल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली. त्याशिवाय, सात शाळांनी यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे. शिक्षण विभागाने ३० अनधिकृत शाळांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे उर्वरित ५८ शाळांवर गुन्हे दाखल होण्याची कारवाई कधी होणार, याच्या प्रतीक्षेत वसईकर नागरिक आहेत.

वसई तालुक्यात अनधिकृत शाळांची संख्या वेगाने वाढत असून अनेक ठिकाणी शिक्षण विभागाची कोणतीही परवानगी न घेता शाळा उभारल्या जात आहेत. याला आळा घालण्यासाठी तसेच पालकांची व विद्यार्थ्यांची फसवणूक टाळण्यासाठी जिल्हा शिक्षण विभागाकडून दरवर्षी मे महिन्यात अनधिकृत शाळांची यादी जाहीर करण्यात येते. या अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश न घेण्याचे आवाहन पालिकेकडून केले जाते. ही यादी लवकर जाहीर झाल्यास अशा शाळांमध्ये प्रवेश घेणे टाळता येऊ शकते. मात्र दरवर्षी या यादीला विलंब होत असून, प्रवेश घेतल्यानंतर यादी जाहीर होत असल्याची तक्रार पालकांकडून केली जाते. ही यादी लवकर जाहीर करण्याची मागणी दरवर्षीच पालकांकडून करण्यात येत असते.

मागील वर्षी जून महिन्यात ही यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार वसई तालुक्यात एकूण ११० शाळा अनधिकृत असल्याचे समोर आले होते. या यादीमध्ये नमूद शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये, असे आवाहन शिक्षण विभागाने केले होते. तसेच तसे फलकही लावले होते. मात्र प्रवेश घेऊन झाल्यानंतर ही यादी जाहीर करून काय फायदा, असा सवाल पालकांनी केला होता.

मागील वर्षात अनधिकृत जाहीर केलेल्या शाळांना नोटिसा बजावून, फलक लावून त्यानंतर गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिस ठाण्यात पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानुसार आतापर्यंत यातील एकूण ३० अनधिकृत शाळांवर शिक्षण विभागाने विविध पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल केले आहेत. त्यापैकी १५ शाळा या योग्य प्रक्रियेनंतर अधिकृत झाल्या आहेत. तर सात शाळा अधिकृत होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र ५८ अनधिकृत शाळांचा प्रश्न अजूनही कायम आहे. त्यामुळे या शाळांवर लवकरात लवकर कारवाई करावी, अशी मागणी वसईकरांनी केली आहे. आता या शाळांवर गुन्हे कधी दाखल होणार किंवा त्यांच्यावर कारवाई कधी होणार, याकडे वसईकरांचे लक्ष लागले आहे.

वसई-विरारमधील अनधिकृत शाळांचे नव्याने सर्वेक्षण सुरू करण्यात आल्याची माहिती वसईच्या गटशिक्षण अधिकारी माधुरी पाटोळे यांनी दिली. याद्वारे नव्याने शाळांची नावे समोर येतील, लवकरच निश्चित आकडेवारी जाहीर करू, असे त्यांनी स्पष्ट केले.

### अनधिकृत इमारतींमधील शाळांचे काय?

पालिका हद्दीत अनधिकृत इमारतींमध्ये शाळांचे वर्ग भरत असल्याची धक्कादायक माहिती गतवर्षी समोर आली होती. त्यामुळे अशा इमारतींमध्ये भरणारे वर्ग किंवा शाळा अधिकृत आहेत किंवा नाही, याकडेदेखील शिक्षण विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे. वसई-विरार महापालिका हद्दीत एकूण १३० अनधिकृत इमारतींमध्ये शाळा सुरू असल्याची माहिती पालिकेने केलेल्या सर्वेक्षणानंतर समोर आली होती. अशा अनधिकृत इमारतींमध्ये सुरू असलेल्या शाळांमुळे मुलांचे भविष्य धोक्यात आले आहे. त्यामुळे अशा इमारतींत शाळांना परवानगी देऊ नये, अशी मागणी पालकांनी केली आहे.

म.टा.पान क्र.5

# निवृत्ती वय ६० करण्याचे पुन्हा आश्वासन

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**





राज्य सरकारी कर्मचारी, अधिकाऱ्यांना सरसकट जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे आर्थिक लाभ देण्याचे आणि सेवानिवृत्तीचे वय ५८वरून ६० वर्षे करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा दिल्याची माहिती महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघाचे नेते, तसेच प्रमुख सल्लागार ग. दि. कुलथे यांनी गुरुवारी मुंबईत दिली.

पूर्वलक्षी प्रभावाने जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी बेमुदत संपाचे आंदोलन स्थगित केल्याच्या पार्श्वभूमीवर राजपत्रित अधिकारी महासंघाच्या शिष्टमंडळाने गुरुवारी मुख्यमंत्री शिंदे यांची वर्षा बंगल्यावर भेट घेतली. जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी राजपत्रित अधिकारी महासंघ आग्रही आहे. यासंदर्भात राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीसमोर अधिकारी महासंघाला बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधी आणि वेळ देण्याच्या सूचना संबंधितांना कराव्यात, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे या बैठकीत करण्यात आली. केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत आजच्या बैठकीत अभ्यासपूर्ण भूमिका मांडण्यात आली. त्याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. महसूल विभागीय संवर्ग वाटपाच्या अधिनियमातून पदोन्नत अधिकाऱ्यांना वगळणे, सेवानिवृत्ती उपदानाची मर्यादा केंद्राप्रमाणे २० लाख रुपये करणे, ८० वर्षे वयावरील वरिष्ठ सेवानिवृत्तांना केंद्राप्रमाणे निवृत्तीवेतनात वाढ देणे, याविषयी सकारात्मक चर्चा होऊन या मागण्यांवर प्राधान्याने सरकार निर्णय व्हावा, अशी भूमिका महासंघातर्फे बैठकीत मांडण्यात आली.

वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, अधिकारी महासंघाचे संस्थापक तसेच मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, उपाध्यक्ष विष्णू पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

CamScanner

## वालीव गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

# विवाहबाह्य संबंधातून पतीचा खून करणारी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक



विवाहबाह्य संबंधातून पतीचा खून करणारी आरोपी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक करून खुनाचा गुन्हा उकल करण्यात वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे.



विशेष प्रतिनिधी

वसई, दि. ०६ : विवाहबाह्य संबंधातून पतीचा खून करणारी आरोपी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक करून खुनाचा गुन्हा उकल करण्यात वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे. मागील महिन्यात ३१ मार्च २०२३ रोजी सकाळी वालीव हद्दीत वाघराळपाडा येथील खदानित वालीव पोलिसांना सुनीलकुमार मुन्नीलाल दुबे (वय ३२) याचा मृतदेह मिळून आला होता. प्रथमदर्शी मयत सुनीलकुमार दुबे हा दारूच्या नशेत पहाडीवरून पाय घसरून खाली पडून मयत झाला असावा असे गृहीत धरून वालीव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मुंबई येथे जेजे रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी यांनी मयताच्या मृत्यूचे कारण अंतिम DEATH DUE TO STRANGULATION WITH HEAD INJURIES (UN-NATURAL) असल्याचा अभिप्राय दिला. त्यानंतर वालीव पोलिस ठाण्यात गुन्हा रजि. नं ३५६/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने परिसरातील साक्षीदार यांच्या कडील प्राप्त माहितीच्या आधारे मयत याची पत्नी व तिचा प्रियकर यांच्या अनैतिक संबंधात अडथळा आणत असल्याने आरोपी मुन्नीदेवी सुनीलकुमार दुबे वय (२४) व संजयकुमार चंदेश्वर प्रसाद (२४) दोघे रा. वाघराळपाडा, वसई (पूर्व) यांनी संगनमत करून मयत सुनीलकुमार दुबे याला दारू पाजली व वाघराळपाड्याच्या खदानीच्या पहाडीवरून खाली ढकलून दिले तरीही सुनीलकुमार दुबे याला मरण न आल्याने संजयकुमार दुबे याने नायलॉनच्या दोरीने गळा आवळून त्याचा खून केल्याचे निष्पन्न झाले. वालीव पोलिसांनी दोघा आरोपींना अटक केली असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) राहुलकुमार पाटील गुन्हे हे करीत आहेत. परि-२ च्या पोलीस उपआयुक्त पौर्णिमा चौगुले श्रींगी, नालासोपारा विभाग तथा अति. कार्यभार तुळींज विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे पोलीस निरीक्षक (गुन्हे) राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पो. उपनिरीक्षक अर्जुन माळवे, पोहवा मुकेश पवार, मनोज मोरे, शिवाजी महाले, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, बाळू कुटे, स्नेहल शिंदे, समीर पाटील, पोअं. गजानन गरिबे, अभिजीत गढरी यांनी कामगिरी केली आहे.

**नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ ला अधिन राहून या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रीय विभाग स्वामी विवेकानंद नगर (एम.बी. इस्टेट) विरार (पश्चिम) हद्दीतील सदनिका

CamScanner

# इक्कीस लाख की चोरी का पुलिस ने किया भंडाफोड़

**भायंदर:** मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के काशीमीरा पुलिस स्टेशन की हद में टाटा एस टेंपो का दरवाजा तोड़ कर 21 लाख 91 हजार 702 रुपए के मोबाइल तथा इलेक्ट्रॉनिक्स एसेसरीज चुराने वाले चोर को पुलिस ने वलसाड से गिरफ्तार कर मालं बरामद किया है जबकि दूसरे आरोपी की पुलिस को तलाश है। डीसीपी अविनाश अंबुरे ने बताया की काशीमीरा निवासी अनिकेत पवार भिवंडी से भायंदर पश्चिम के क्रोमा स्टोर में भिवंडी से इलेक्ट्रॉनिक्स सामान लेकर डिलीवरी करने आया था तथा अपना टेंपो पेनकरपाड़ा में पार्क किया था उस दौरान अज्ञात चोर ने टेंपो का दरवाजा तोड़ मॉल गायब कर दिया।



पुलिस ने मामला दर्ज कर काशीमीरा पुलिस व क्राइम ब्रांच के सहायक पुलिस निरीक्षक प्रशांत गागुर्दे ने घटनास्थल का दौरा कर 500 से अधिक सीसीटीवी फुटेज खंगालकर गुजरात के वलसाड से विशाल राजभर को गिरफ्तार कर मॉल बरामद किया है जबकि दूसरे आरोपी सुशील मंडल मीरारोड की गिरफ्तारी बाकी है। गिरफ्तार आरोपी विशाल राजभर के खिलाफ मुंबई ठाणे तथा वलसाड में करीब 10 अपराधिक मामले बताए जाते है।

यह कार्रवाई पुलिस आयुक्त मधुकर पांडे अपर पुलिस आयुक्त श्रीकांत पाठक तथा उपायुक्त जयंत बजवले , सहायक पुलिस आयुक्त विलास सानप के मार्गदर्शन में काशीमीरा के वरिष्ठ पुलिस निरीक्षक संदीप कदम, सहायक पुलिस निरीक्षक प्रशांत गागुर्दे, पुलिस उप निरीक्षक प्रकाश काबरे तथा पुलिस स्टाफ ने सफलतापूर्वक करके चोरी गया मॉल बरामद किया है।

CamScanner

# कर्कश हॉर्न वाजवत फिरणाऱ्या ३ जणांवर कारवाई

भाईंदर - मीरा-भाईंदर शहरात गेल्या तीन महिन्यांत सायलेंट झोनमध्ये आपल्या वाहनांचे कर्कश हॉर्न वाजवत फिरणाऱ्या तीन जणांवर कारवाई करण्यात आली आहे. शहरातील काही बेशिस्त वाहनचालक सायलेंट झोनमध्ये देखील आपल्या वाहनांचे कर्कश हॉर्न वाजवत फिरत असतात यामुळे दवाखाना, शाळा व इतर शासकीय कार्यालय यांना त्रास सहन करावा लागतो. वाहतूक पोलिसांनी अशा लोकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्याची गरज आहे. मीरा-भाईंदर शहरात गरजेच्या ठिकाणी 'नो हॉन्किंग/ सायलेंट झोनची' फलक लावण्याची गरज भासू लागली आहे.

वाहतूक पोलिसांनी शहराची पाहणी करून ज्या ठिकाणी प्रस्तुती गृह आहेत त्या परिसरात 'सायलेंट झोन' बाबत फलक लावावेत जेणे करून वाहनचालकांना फलक बघून त्या परिसरात हॉर्नचा वापर करायचा नाही आहे याबाबत माहिती मिळेल. शहरातील गोल्डन नेस्ट, बीपीरोड, इंद्रलोक, भाईंदर पश्चिम-पूर्व अशा अनेक ठिकाणी अशा प्रकारचे फलक लावण्याची गरज आहे. काशिमिरा वाहतूक पोलीस नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दररोज वेगवेगळ्या कलमांनुसार कारवाई करत असतात. लोकांनी वाहतूक नियम पाळावे याकरिता जनजागृती करून त्यातून वाहतूक नियमांबाबत समजवण्यात येते. मीरा-भाईंदर शहरातील काही बेशिस्त वाहनचालक वाटेल तसे हॉर्न वाजवत वाहने चालवत असतात. प्रस्तुती गृहाच्या बाहेर हॉर्न मारल्याने नव्याने जन्माला आलेल्या मुलांना त्रास होऊ शकतो, रुग्णालयात दाखल असलेल्या काही वयोवृद्धांना देखील यामुळे त्रास होत असतो. त्यामुळे त्यांना त्रास मुक्त करण्यासाठी वाहतूक पोलिसांतर्फे आता नो हॉन्किंग/ सायलेंट झोनची फलक लावून सुरुवात करण्यात यावी, अशी मागणी होऊ लागली आहे.

CamScanner

# पार्क किए गए टैम्पो से चोरी करने वाले चोर गिरफ्तार



प्रात:काल संवाददाता

**मुंबई।** मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत काशीमिरा पुलिस स्टेशन क्षेत्र से चोरी करने वाले दो चोर को गिरफ्तार किया गया है। बताया जा रहा है कि यह चोर पार्क किए गए एक टैम्पो का शटर तोड़कर 21 लाख से अधिक के कीमत के इलेक्ट्रॉनिक सामान की चोरी करके फरार हो गए थे। वहीं पुलिस की टीम ने सेकड़ों सीसीटीवी फुटेज खांगालकर एक चोर को गुजरात और दूसरे को काशीमिरा से गिरफ्तार किया है।

बता दें कि मीरारोड निवासी अनिकेत नवनाथ पवार ने काशीमिरा पुलिस स्टेशन चोरी की शिकायत दर्ज कराई थी। 30 मार्च को अनिकेत भिवंडी से 21,91,000 रुपये कीमत के इलेक्ट्रॉनिक सामान टेंपों में भरकर ले आया था ,और मीरारोड स्थित क्रोमा स्टोर पर डिलिवरी देना था। जिसके लिए टैम्पो को काशीमिरा के पेनकरपाड़ा स्थित सड़क किनारे पार्क किया था। लेकिन अज्ञात चोर ने टैम्पो का शटर तोड़कर अंदर रखे लाखों रुपये के कीमती सामान चोरी करके फरार हो गए। चोरी की शिकायत के बाद मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय डिवीजन 01 के अपर पुलिस आयुक्त जयंत बजबले के आदेशानुसार वरिष्ठ पुलिस निरीक्षक संदीप कदम के मार्गदर्शन में डिटेक्शन एपीआय प्रशांत गांगुर्ड, पीएसआय प्रकाश कावरे की पुलिस टीम ने घटनास्थल के आसपास सीसीटीवी फुटेज और टेक्निकल सहायता एवं गुप्त सूचना के आधार पर चोर की शिनाख्त की।

चोर की पहचान होने के बाद पुलिस ने मोबाईल लोकेशन ट्रेस कर एक चोर को गुजरात के वलसाड से धरदबोच लिया। उससे पूछताछ करने पर चोरी करने की बात कबूली और अपने साथीदार की जानकारी दी। उसके बाद पुलिस ने उसके साथीदार को पेनकरपाड़ा से पकड़ लिया। यही नही पुलिस टीम ने चोर द्वारा बताए गए स्थान से चोरी का माल भी बरामद किया। पुलिस टीम ने 21,59,000 रुपयों के कीमती मोबाईल, इलेक्ट्रॉनिक सामान आदि का माल जप्त किया। फिलहाल पुलिस ने विशाल रमेश राजभर आकाश सुनिल मंडल के खिलाफ कई धाराओं के तहत मामला दर्ज कर आगे की जाँच पड़ताल कर रही है।

CS CamScanner

लोकमत

# विरारमध्ये ब्राऊन शुगर जप्त

नालासोपारा : विरारमध्ये ब्राऊन शुगरचा साठा जप्त करण्यात विरार पोलिसांना यश आले आहे. जीवदानीपाडा येथे बुधवारी दुपारी एकच्या सुमारास राजेश गोविंद गाजूला (४३) व भूत ऊर्फ साबीर मेहम्मूद सय्यद (४९) यांच्याकडे २० हजार रुपये किमतीचा २० ग्रॅम वजनाचा ब्राऊन शुगर नावाचा अमली पदार्थ आढळून आला होता. हे अमली पदार्थ दोन्ही आरोपींनी बेकायदा विक्रीसाठी आणले असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून आरोपीविरोधात बुधवारी विरार पोलिस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टखाली गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 5 Apr 07, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

# नोकरी देण्याच्या नावाखाली फसवणूक झालेल्या युवकाची सुखरूप सुटका

मीरा रोड - भाईंदर येथे राहणाऱ्या युवकाला थायलंड येथे कंपनीत नोकरी देण्याचे सांगून थायलंड येथून बेकायदेशिररित्या म्यानमार येथे नोकरीला पाठवून त्या ठिकाणी छळ करत होते. त्या युवकाला भारतात पुन्हा यायचे होते, परं त्याला येता येत नव्हते. भरोसा सेलने त्याला मद केली आहे. म्यानमार येथून त्याची सुखरूप सुटका करत पुन्हा भारतात परत आणण्यास भरोसा सेलला यश मिळाले आहे.

मीरा-भाईंदर भरोसा सेल येथे महिला परवीन शेख (५०) रा. उत्तन, भाईंदर पश्चिम यांनी तक्रार दिली. त्यांचा मुलगा शहजान खान (२५) यास ठाणे येथील एजंटने थायलंड येथे नोकरी मिळवून देतो, असे सांगून ४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रथम चेन्नई एअरपोर्ट येथे पाठवून टुरिस्ट व्हिजाच्या माध्यमातून थायलंड येथे पाठवले. त्यानंतर थायलंड येथून बेकायदेशिररित्या या देशातून त्या देशात (पुशिंग) दिशाभूल करून म्यानमार येथे पाठवले. म्यानमार येथील एका कंपनीमध्ये त्याला कॉलिंग करण्याचे काम दिले होते. दिलेले टारगेट पूर्ण झाले नाही, तर अमानुष छळ केला जात होता. त्याचा मोबाइल काढून घेण्यात आला होता. २८ दिवसांनंतर शहजानला अर्ध्या तासासाठी मोबाइल देण्यात आला होता. त्यावेळी त्याने आई परवीन यांना फोन करून त्याची फसवणूक झाली असून, थायलंड येथे नोकरी न देता पुशिंगच्या माध्यमातून त्याला म्यानमार येथे नेल्याचे सांगितले. शहजान याच्यासोबत कोणताही संपर्क होत नसल्यामुळे तो नक्की कुठे आहे व कोणत्या परिस्थितीमध्ये आहे, याबाबत परवीन यांना कोणतीही माहिती नव्हती. परदेशात कामानिमित्त गेलेले मुलाला सुखरूप परत भारतात आणण्यासाठी त्यांनी भरोसा सेल येथे तक्रार अर्ज दिली होती.




शहजान खानची सुखरूप सुटका करणारे पोलीस अधिकारी

भरोसा सेल येथे परवीन खान यांनी दिलेल्या अर्जाची माहिती वरिष्ठांना देऊन त्यांचे मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे भरोसा सेलच्या सपोनि तेजश्री शिंदे यांनी भारतीय दूतावास यांना संपर्क साधून त्यांच्या मदतीने शहजान खान यास ३० मार्च २०२३ रोजी सुखरूप भारत देशात आणले. मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येते की, परदेशात नोकरी देतो, अशी खोटी बतावणी करून पुशिंगच्या

मुंबई
बो
एमए
जादूटो
भीती दार
पोलिसांनी
हा मांत्रिक मध्
घराबाहेर जादूटो
मांत्रिकाला पोलिसांनी ग्

# वर्षभरात पाच कोटींहून अधिक रुपयांचा दंड जमा

मीरारोड - काशिमीरा वाहतूक शाखेच्या पोलिसांनी वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करत पूर्ण वर्षभरात एकूण १,२४,४७६ केस करत ५,०८,९१,०००/- रुपये दंड वसूल केल्याची माहिती वाहतूक शाखेच्या मार्फत देण्यात आली आहे.



वाहतूक पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये वर्षभरात १,४६१ वाहन चालकांचे लायसन्स सस्पेंड करण्यात आले आहेत. त्याच बरोबर सर्वाधिक केस केलेल्या आकडेवारीमध्ये अवैध प्रवासी वाहतूक ३०२ केस करत २७,९०.००० दंड वसूल करण्यात आला आहे. दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यावर एकूण २४९ केस करत ४,९५,३०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. विना हेल्मेट वाहन चालवणे याच्या २,३३४ केस करत ८,५३,००० दंड वसूल करण्यात आला आहे. याचबरोबर सर्वात अधिक दंड वसूल करण्यात आला, त्यात विधाऊट हेल्मेट, सिग्नलचे पालन न करणे, विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, वाहन चालवताना फोनवर बोलणे, धोकादायकरित्या वाहन चालवणे, नो पार्किंग, विना सीटबेल्ट व इतर केसेस यांचा देखील समावेश आहे.

## चौदाशेहून अधिक लायसन्स सस्पेंड

वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास हांडोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार यापुढेही वाहतूक पोलीस अशीच कारवाई करत राहतील. नियम तोडणाऱ्यांवर आळा घालण्याकरीता आता ई-चलान मशीनची खूप मदत होत आहे व यामुळे दंडाची जास्तीत जास्त रक्कम सरकारकडे जमा होत आहे. त्याच बरोबर बेशिस्त वाहन चालकांमुळे अपघात होतात. अपघातामध्ये जिवीतहानी होऊन दरवर्षी भारतात लाखो लोक मरण पावतात. ते कमी करण्यासाठी शिस्तीने वाहने चालवणे आवश्यक आहे. नागरिकांच्या रस्त्यावरील सुरक्षेसाठी त्यांना शिस्त लावणे आम्ही चालूच ठेवणार असल्याचे देखील वरिष्ठ पोलीस निरीक्षक हांडोरेंनी सांगितले आहे.

CS CamScanner